# गर्जा महाराष्ट्र माझा

(महाराष्ट्र गौरव गीते)



# वंदे मातरम्

वंदे मातरम् !

सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सश्यश्यामलाम् मातरम् । वंदे मातरम् ।।

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनिम्
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणिम्
सुखदाम् वरदाम् मातरम् ।। वंदे मातरम् !


कोटि कोटि कण्ठ कलकल निनाद कराले,
कोटि कोटि भुजैर्धृत खरकरवाले,
अबला केन मा एकबले बहुबलधारिणिम्
नमामि तारिणिम् रिपुदलवारिणिम् । मातरम् !
वंदे मातरम् !!

तुमि विद्या, तुमि धर्म, तुमि ह्रदि, तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे, बाहुते तुमि मा शक्ति,
ह्रदये तुमि मा भक्ति, तोमारई प्रतिमा गडि मंदिरे ।
मातरम् ! वंदे मातरम् !!

त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी ।
कमला कमलदल विहारिणी । वाणी विद्यादायिनी,
नमामि त्वां । नमामि कमलाम्, अमलाम्, अतुलाम्
सुजलाम्, सुफलाम् मातरम् ।। वंदे मातरम् !!

श्यामलाम्, सरलाम्, सुस्मिताम्, भूषिताम्
धरणीम् भरणीम् मातरम् । वंदे मातरम् !!

- बंकिमचंद्र



# गर्जा महाराष्ट्र माझा

(महाराष्ट्र गौरव गीते)

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व संपादन : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट, गांधी हॉस्पिटल जवळ,
  लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# अनुक्रम :


प्रास्ताविक ........................................ ४

१. मंगलदेशा, पवित्र देशा ! .......................... ६

२. महाराष्ट्र गीत ........................................ ७

३. जय जय महाराष्ट्र माझा ............................ ९

४. महाराष्ट्र गीत ........................................ १०

५. अभिवादन ........................................ ११

६. महाराष्ट्र आधार या भारताचा ..................... १२

७. आमुची मायबोली .................................. १३

८. मराठीच्या ओव्या .................................. १५

९. मराठी माती ........................................ १६

१०. माझा महाराष्ट्र ...................................... १८

११. महाराष्ट्र जयगान .................................. २०

१२. मायबोली ........................................... २१

१३. शूर आम्ही सरदार ................................. २२

१४. केवळ माझा सह्यकडा ............................ २३

१५. शिवकल्याण राजा ................................. २६

१६. शिवाजी ............................................. २८

१७. श्रीशिवाजी महाराजांची आरती .................. २९

१८. हिंदु नृसिंह ......................................... ३०

१९. शिवराजासी आठवावें ............................. ३१

२०. आनंदवनभुवनी ..................................... ३२

२१. मऱ्हाटी भाषासुंदरी ................................ ३३

२२. जय जय जय शिवराया ........................... ३४

२३. माझी मायबोली आज आली माहेराला ............ ३५

२४. वेडांत मराठे वीर दौडले सात .................... ३६

२५. नीज नीज रे शिवराया ............................ ३८

२६. शतकांच्या यज्ञांतून ................................ ४०

# दोन शब्द !

**भा**षावार प्रांत रचनेच्या सूत्रानुसार स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. अर्थात त्यासाठीही महाराष्ट्रातील जनलोकांना प्रदीर्घ काळ लढा द्यावा लागला. हौतात्म्य पत्करावं लागलं. आज महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला पन्नास वर्षाहूनही अधिक काळ लोटला आहे.

भारताच्या नकाशात भौगोलिक सीमांनी बंदिस्त झालेला आजचा महाराष्ट्र पन्नास वर्षापूर्वी अस्तित्वात आलेला असला तरी त्याचं अस्तित्व त्यापूर्वीही नांदत होतं. आजही ते नांदत आहे. त्याच्या या नांदण्याला कोणत्याही सीमा नाहीत. कारण त्याचं अस्तित्व जनलोकात आणि जनमनात होतं. ते जसं संत साहित्यात होतं तसंच ते लोककलातून, लोकसाहित्यातून तसेच पंतकवि, तंतकवि आणि आधुनिक कवींच्या काव्यातूनही व्यक्त होत होतं. इतकंच नव्हे तर या असण्याला एका अस्मितेचं कोंदण होतं. अधिष्ठान होतं. देव, देश आणि धर्म ही या अस्मितेची त्रिपुटी आहे तर मराठी भाषा, छत्रपती शिवरायांचा आदर्श आणि स्वातंत्र्यावरची अढळ, अभंग निष्ठा ही या अस्मितेची त्रिसूत्री आहे. ही त्रिपुटी आणि त्रिसूत्री यांचा सन्मान म्हणजेच महाराष्ट्र प्रेम ! हे प्रेम

ज्याच्या ठायी अभंग आहे तो आपला असं महाराष्ट्राची लोकसंस्कृती मानते.

महाराष्ट्राची ही परंपरा छत्रपती शिवरायांनी राजधर्म म्हणून स्वीकारली आणि रयतेच्या मनात ती मनोधर्म म्हणून रुजवली. गेली जवळपास साडेतीनशे वर्षे मराठी जनांच्या ती अंगवळणी पडली आहे. या परंपरेबद्दल नेहमी खूप लिहिलं बोललं गेलं आहे. पण या परंपराचं मर्म असंख्य मराठी कवितांमधून खूप नेमकेपणाने सांगितलं गेलं आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेची त्रिपुटी आणि त्रिसूत्रीचं यथातथ्य लाघव वर्णन करणाऱ्या काही कविता सोबतच्या "गर्जा महाराष्ट्र माझा" या काव्यसंग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या कवितेतील आशय उत्स्फूर्त तर आहेच शिवाय तो उत्कट असा सहजोद्‌गारही आहे. खरं तर ही काव्यसंपदा हे महाराष्ट्राचं फार मोठं आचार-विचारधन आहे. या पुस्तिकेच्या रुपाने आजच्या युवा आणि बाल-किशोरांच्या पिढीला या संपदेची ओळख व्हावी तसेच त्यांच्या काळजावर महाराष्ट्रातील जाणत्या, नेणत्या तसेच श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कवींनी महाराष्ट्राचे, मराठी भाषेचे आणि जाणता राजा श्रीशिवरायांच्या गुणांचे जे पवाड गायले आहेत त्यातील आशय मनावर ठसावा, हाच एकमेव उद्देश या पुस्तिकेच्या प्रकाशनामागे आहे. तो सफल व्हावा ही आंतरिक इच्छा !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

**- गुरुदास**